Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,
ई बालभारती शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे/प्राधान्ये

क्र.रा मं. /परीक्षा -३/३६४४
पुणे -४११००४
दिनांक- ०१/०९/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी – मार्च- २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याच्या सूचनाबाबत .

संदर्भ – या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं /परीक्षा -३ /३२३४ दिनांक -३१/०७/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षा फेब्रु – मार्च- २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज त्याच्या यापूर्वी शिकलेल्या शाळेतून/ कनिष्ठ महाविद्यालयामधून भरणे अनिवार्य असल्याचे संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात आले होते .

तथापि याबाबत सूचित करण्यात येते की, अपवादात्मक परिस्थितीत ज्या विद्यार्थ्यांना मागील शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामधून खाजगी विद्यार्थी नावनोंदणी करणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा सध्याचा रहिवासी पत्ता (Current Address) नमूद करावा व त्याबाबतचा आवश्यक तो पुरावा अपलोड करावा. त्यानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांची निवड विद्यार्थ्यनि करावयाची आहे.

ज्या विद्यार्थ्यांना नावनोंदणी करताना दूरच्या शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नावनोंदणी करावी लागत आहे अशा विद्यार्थ्यांच्या बाबत विभागीय मंडळांनी रहिवासी पत्ता व निवडलेली शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांची पडताळणी व खात्री करावी.

तरी याबाबत विभागीय मंडळांनी आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही यांची दक्षता घ्यावी .

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ पुणे-०४

क्र मुविमं /खा.वि./ ४१०९
वाशी, नवी मुंबई-४००७०३
दि .०९/०९/२६

प्रति,
प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय

उपरोक्त पत्रानुसार प्राचार्य/ मुख्याध्यापक.यांनी आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव
मुंबई विभागीय मंडळ.